पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०५/०९/२०१९**

## नक्षलवाद्यांसोबत लढण्यासाठी एकजुटीने उभे राहण्याचे मा. पोलीस अधीक्षकांचे जनतेला आवाहन.

- **मौजा कुलभट्टी येथे संपन्न महाजनजागरण मेळाव्यात नक्षल गावबंदी व विधानसभेसाठी निर्भयपणे बाहेर पडुन मतदान करण्याची नागरिकांनी घेतली शपथ.**

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. मोहित कुमार गर्ग सा़ो., सीआरपीएफ ११३ बटालीयनचे कमाडंट श्री. जी. डी. पंढरीनाथ, जिल्हा परिषद सदस्या सौ. लताताई पुंगाटी यांच्या उपस्थितीत उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोस्टे सावरगाव हद्दीतील मौजा कुलभट्टी येथे **^महाजनजागरण मेळावा*** यशस्वीपणे पार पडला. सदर मेळाव्यास, मुरुमगाव, सावरगाव, कटेझरी, ग्यारापत्ती, हद्दीतील २५०० ते ३००० नागरिक उपस्थित होते.

मेळाव्याच्या सुरुवातीस मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी मा. पोलीस अधीक्षकांनी नक्षलवादी कशा प्रकारे आदिवासी जनतेच्या भोळेभाबळेपणाचा फायदा उठवितात आणि आदिवासींची पिळवणुक करतात याबद्दल नागरिकांना माहिती दिली. यावेळी त्यांनी बेबी मडावी व जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक युगेंद्र मेश्राम यांचा दाखला देत, नक्षलवादी कशा प्रकारे निष्पाप नागरिकांचा स्वत:च्या फायद्यासाठी खून करतात याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी नक्षलवाद्यांसोबत लढण्यासाठी आदिवासी  बांधवांनी एकजुटीने व एकदिलाने एकत्र येण्याचे आवाहन केले. यासाठी ग्रामसभांनी नक्षल गावबंदी करावी व नक्षल्यांना विरोध करून गावाच्या

विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन ग्रामसभांना केले. कार्यक्रमावेळी उपस्थित नागरिकांना आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले.

यावेळी केहकावाही, चव्हेला, कुलभट्टी, या गावातील आदिवासी बांधवांनी **रेला नृत्य** सादर केले. धानोरा उपविभागांतर्गत येत असलेल्या नक्षल कुटुबीयांना नक्षलमध्ये गेलेल्यांनी आत्मसमर्पण करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रयास उपक्रमांतर्गत गावकऱ्यांना जात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार त्यांना पाण्याची टाकी, सोलर लाईट, शेतीकरीता उपयोगी फवारणी पंप, इलेक्ट्रीक मोटर पंप, मिक्सर, पेन्डाल साहित्य, सायकल, अपंगांकरीता तीन चाकी सायकल, मच्छर दाणी, भजन वाद्य साहित्य, बसण्याचे बाक, विद्यार्थ्यांकरीता स्कुल बॅग, महिलांकरीता साडी, असे मोठ्या प्रमाणावर जीवनावश्यक साहित्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मेळाव्यास उपस्थित नागरिकांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी गडचिरोली पोलीस दलातर्फे मौजा कुलभट्टी येथील नागरिकांना देण्यात आलेले सौरलाईट व मनोरंजन हॉल करिता देण्यात आलेले, टिव्ही व डीशचे उद्‌घाटन, मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मेळाव्यास उपस्थित नागरिकांनी मा. पोलीस अधीक्षकांना कुलभट्टी येथील गावाच्या तलावाचे खोलीकरण करणे, हिरंगे नाल्यावरती छोटा पुल बांधणे, कुलभट्टी ते बोधीलखेडा रस्त्यांची डागडुजी करणे व जात प्रमाणपत्र मिळावेत याबाबत मागणी केली. मा. पोलीस अधीक्षकांनी लवकरात लवकर आपल्या सर्व मागण्यांचा पाठपुरावा करुन त्या पुर्ण केल्या जातील असे आश्वासन उपस्थित नागरिकांना दिले.

मेळाव्यास उपस्थित पोलीस अधिकारी व नागरिकांनी नक्षलवाद्यांनी विनाकारण निघृणपणे खून केलेल्या आदिवासी बांधव व शहीद पोलीस शिपाई यांच्या स्मरणार्थ दोन मिनीटे मौन पाळुन श्रध्दांजली वाहीली. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी आम्ही नक्षलवाद्यांना गावात पाय ठेवु देणार नाही. तसेच येत्या विधानसभा निवडणुकीत शंभर टक्के मतदान करू अशी शपथ घेत, ग्रामसभेत नक्षल बंदीचा ठराव घेवु असे आश्वासन मा. पोलीस अधीक्षकांना दिले.





